सायं.दैनिक बीड **किसान** आवाज जनसामान्यांचा..

• संपादक : शेख कामरान •

बीड ▪ वर्ष ५ ▪ अंक ५९ ▪ शनिवार, दि. ०५ जुलै, २०२५ ▪ पोस्टल दिनांक ०६ जुलै, २०२५ ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ पाने ४ ▪ किंमत २ रु.

BEED ▪ Year-5 ▪ Issue-59 ▪ Saturday 05 July, 2025 ▪ Postal Date 06 July, 2025 ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ Pages 4 ▪ Price 2

## भरदिवसा घरफोडी; सव्वा लाखांचा ऐवज लंपास

गेवराई (किसान न्युज): तालुक्यातील रोहितळ येथे अज्ञात चोरट्यांनी भरदिवसा घराचा दरवाजा तोडून सोन्या चांदीच्या दागिन्यांसह रोख रक्कम असा एकूण १ लाख २९ हजार ५०० रुपयांचा ऐवज लंपास करण्यात आला आहे. याप्रकरणी अज्ञात चोरट्यांविरुद्ध तलवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना शुक्रवार (दि.४) सकाळी ९ ते २ च्या सुमारास घडली आहे. जिल्हाभरात चोरीच्या घटनेत मोठ्या प्रमाणात वाढ होताना दिसत आहे. गेवराई तालुक्यातील रोहितळ येथील देवकांत राजकुमार गायकवाड यांच्या घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी भर दिवसा कपाटातील ५० हजार रोख रक्कम, १६ ग्रामचे गंठण, ४ ग्रामचे लॉकेट, २ ग्रामचे टॉप गंठण तसेच अंगठी, बोरमाळ, झुंबर असा एकूण १ लाख २९ हजार ५०० रुपयांचा ऐवज लंपास केल्याची केला आहे. या अशयाची फिर्याद देवकांत गायकवाड यांनी दिली. त्यावरुन तलवडा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचा तपास तलवडा पोलीस करीत आहेत.

# त्या जुन्या तक्रारीवरून विजय पवारवर गुन्हा दाखल होणार!

# चाकणकर म्हणाल्या २०२३ मध्येच शिक्षण विभागाने त्या तक्रारीची दखल घेतली असतीतर ही घटना घडलीच नसती!

## आहो रुपालीताई, कित्तेक तक्रारी धूळ खात असतील या पवारने आजपर्यंत पैसा अन् ताकदीच्या जोरावर मुस्कटदाबीच केली आहे!

बीड । किसान न्युज

**उमाकिरण बाल लैंगिक अत्याचार प्रकरण गुरु-शिष्याच्या नात्याला काळीमा फासणारा असून, चीड अणणारा आहे. यातील आरोपी विजय पवार आणि प्रशांत खाटोकर या दोघांवर कायद्याची जरब बसेल अशी कारवाई करुन पीडितेला न्याय देणार असल्याचे सांगितले तसेच २०२३ मध्येही अशीच तक्रार विजय पवार विरोधात आलेली होती असा उल्लेख केला असून याप्रकरणी चौकशी करुन गुन्हा दाखल करण्याची सूचना केली. यामुळे विजय पवार पाय आणखीन खोलात गेल्याचे दिसून येत आहे. पवार व खाटोकरला मदत करणाऱ्यांनाही उघडे पाडून त्यांच्यावर ही कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलीस अधीक्षक कार्यालयात पत्रकार परिषद बोलताना चाकणकर यांनी सांगितले.**

शहरातील उमाकिरण बाल लैंगिक अत्याचार प्रकरणी आज राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी बीड येथे भेट देऊन पीडिता आणि पालकांची भेट घेऊन तब्बल एक तास चर्चा केली. यानंतर पोलीस अधीक्षक कार्यालयात पत्रकारांशी संवाद साधला, यावेळी बोलताना चाकणकर म्हणाल्या की, उमाकीरण प्रकरण चीड आणणारे असून, तिथे हजार पेक्षा जास्त मुली असताना एकही महिला कर्मचारी नाही याबाबत खेद व्यक्त करीत या प्रकरणात पीडितेला न्याय आणि आरोपींना कठोर शासन व्हावे यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. पीडितेशी चर्चा करताना अनेक घटना क्रम समोर आले आहेत. तर तीचे व्हिडिओ ही बनविण्यात आले आहेत असे सांगितले, तर याप्रकरणी मोबाईल, सीसीटीव्ही फुटेज, लॅपटॉप, संगणक आदी पोलीस प्रशासनाने ताब्यात घेतले आहेत. मदत करणारा अजय नारायण गोत्रे याच्यावरही कारवाई करण्यात आली असून सीडीआर तपासून मदत करणारे उघडकीस आणून त्यांच्यावर ही कारवाई करण्यात येणार असे स्पष्ट करीत कोणालाही सोडणार नाही. पीडिता सध्या मानसिक तणावाखाली आहे. तीच्या मनावर आघात झाला असल्याने तीला इतक्या कमी वयात मानसिक तज्ञांकडून उपचार घेण्याची वेळ आली. यामध्ये पीडितेच्या आईने पुढे येत तक्रार केल्याने या प्रकरणाला वाचा फुटली आहे. यामुळे त्या आईचे आभार मानत अशा प्रकारातून कोणाला जावे लागले असेल तर अशा मुली आणि पालकांनी पुढे येऊन तक्रार करण्याचे अथवा काही पुरावे असतील तर पोलिसांकडे

» पान २ वर

### पोलीस अधीक्षक यांचे कौतुक



**हे प्रकरण उघड होताच गुन्हा दाखल करुन योग्य ती कारवाई केली. दोनच दिवसात याप्रकरणी सर्व सीसीटीव्ही फुटेज, लॅपटॉप, संगणक, मोबाईल जप्त केले आहेत. तसेच मी गुन्हा दाखल झाल्यापासून पोलीस अधीक्षक यांच्या संपर्कात आहे. त्यांनी यामध्ये खूप चांगली भूमिका आणि तपास केला आहे असे म्हणत पोलीस अधीक्षक यांच्या कामाचे कौतुक केले.**

## ज्यांनी मदत केली त्यांनाही आणणार समोर तर कायद्याची जरब बसेल अशी कारवाई होणार : रुपाली चाकणकर



### रश्मी आरोरा यांच्या चौकशीची मागणी

उमाकिरण प्रकरणातील आरोपी विजय पवार याची ज्ञानेश्वर पब्लिक स्कूल ही इंग्रजी शाळा आहे. या शाळेवर मुख्याध्यापक असणाऱ्या रश्मी आरोरा यांनी विजय पवार यास पळून जाण्यासाठी मदत केल्याची शंका उपस्थित केली जात आहे. यामुळे या आरोरा मॅडमचा ही सीडीआर काढण्यात यावा तसेच या दिशेने तपास आणि चौकशी करावी अशी मागणी करण्यात येत आहे.



### खाटोकर दुचाकीवर पीडितेला कुठे नेत होता?

**उमाकिरण प्रकरणातील आरोपी प्रशांत खाटोकर हा पीडितेला आपल्या दुचाकीवर घेऊन जात होता. तो नेमकं कोणाकडे घेऊन जात होता असा प्रश्न चाकणकर यांनी उपस्थित करुन या दुचाकी प्रकरणाची चौकशी करुन तो कोण? समोर आणणार असेही महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी यावेळी सांगितले.**

### डॉ. ज्योती मेटे यांनी घेतली रूपाली चाकणकर यांची भेट



बीड - जिल्ह्याच्या दौऱ्यावर असलेल्या राज्याच्या महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांची शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती मेटे यांनी येथील शासकीय विश्रामगृह येथे भेट घेतली. यावेळी बीड येथे उमाकिरण शैक्षणिक संकुलात घडलेल्या घृणास्पद प्रकरा संदर्भात पोलीस यंत्रणेकडून निपक्ष चौकशी होऊन पुढील योग्य ती कारवाई होईल याकडे जातीने लक्ष द्यावे अशी विनंती केली आहे.

## अंबाजोगाईच्या स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयात कॅन्सर विभाग पुर्ववत सुरु करा



### आमदार नमिता मुंदडांनी केली अधिवेशनात मागणी

अंबाजोगाई । किसान न्युज

अंबाजोगाई येथील स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयात कॅन्सर विभाग पुर्ववत सुरु करण्यात यावा अशी मागणी आ. नमिता मुंदडा यांनी विधीमंडळाच्या अधिवेशनात केली आहे. राज्यातील विविध प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी सध्या राज्य विधीमंडळाचे अधिवेशन सुरु आहे. या अधिवेशनात राज्यातील प्रत्येक आमदार आपल्या मतदारसंघातील प्रलंबित प्रश्न अधिवेशनात विधिमंडळ सभापतींच्या समोर मांडुन ते मार्गी लावण्याचा प्रयत्न करीत असतात. अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय हे आशिया खंडातील एकमेव ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय आहे. या वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाच्या माध्यमातून मराठवाड्यातील ग्रामीण भागातील रुग्णांना अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याचा राज्य शासन सातत्याने प्रयत्न करीत असते. याच उद्देशाने या वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात या विभागातील कॅन्सर रोगाने ग्रस्त झालेले अनेक रुग्ण आढळून येत असल्यामुळे सुमारे पंचेवीस वर्षांपूर्वी या वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालय विभागात कोट्यवधी रुपये खर्चून स्वतंत्र कॅन्सर विभाग निर्माण करण्यात येवून या विभागात रोग निदान आणि उपचारांची सुरुवात करण्यात आली होती. मात्र हा विभाग कालांतराने पुरेसे तंत्रज्ञ आणि अनुभवी तज्ञ डॉक्टर मिळत » पान २ वर

## आ.संदीप भैय्यांच्या पुढाकारातून मिळणार निराधारांना आधार

### संजय गांधी, श्रावणबाळ योजनेचे नवीन ३७८ प्रस्ताव मंजूर



बीड । किसान न्युज

बीड ग्रामीण व शहरी भागातील ३७८ निराधार, दुर्बल लोकांचे संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा निवृत्तीवेतन योजनेंतर्गत प्रस्ताव मंजूर झाले असून आ.संदीप क्षीरसागर यांच्या पुढाकारातून आणि प्रयत्नातून निराधारांना आधार मिळणार आहे. पात्र वयोवृद्ध निराधार, अपंग, विधवा, परित्कत्या, दुर्धर आजाराने ग्रस्त असलेल्या समाजातील दुर्बल घटकांना शासनाकडून संजय गांधी निराधार योजना आणि श्रावणबाळ सेवा निवृत्तीवेतन योजनेंतर्गत आर्थिक सहाय्य केले जाते. बीड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील » पान २ वर

**पाहिजेत**

अनुभवी मॅनेजर व रूम बॉय नाईट साठी हॉटेल हिना लॉज जालना रोड बीड

Mob : 9325343615

### दिनकर शिंदे यांना बंधू शोक

गेवराई । किसान न्युज



येथील पत्रकार दिनकर शिंदे यांचे मोठे बंधू नंदकुमार शिंदे (वय ५२ वर्ष ) यांचे पुणे येथील दवाखान्यात उपचारादरम्यान हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, आई-वडील, दोन भाऊ, एक बहीण असा परिवार आहे. नंदकुमार शिंदे यांच्या पार्थिवावर आज सिध्देश्वर स्मशानभूमीत अंत्यविधी करण्यात आला. शिंदे कुटुंबावर कोसळलेल्या दुःखात दैनिक किसान परिवार सहभागी आहे.

## एआयएमआयएमच्या बैठकीस उपस्थित रहा : एजाज,भोसकर

बीड । किसान न्युज

आगामी नगरपालिका , जिल्हा परिषद , पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एआयएमआयएम पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खा.बॅरीस्टर असदुद्दीन औवेसी साहेब, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष मा.खा.ईम्तियाज जलील साहेब, मा फेरोज लाला साहेब यांच्या आदेशानुसार, मा.AIMIMपक्षाचे मा.बीड जिल्हा अध्यक्ष ॲड शेख शफीक भाऊ भाऊ यांच्या





प्रमुख उपस्थितीत बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.जिल्ह्याच्या प्रत्येक नगरपालिका , जिल्हा परिषद, पंचायत समिती व बीड तालुक्यातील शहरातील आजी-माजी पदाधिकारी, नगरसेवक आणि कार्यकर्त्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन मा. AIMIM बीड जिल्हा उपाध्यक्ष तथा बीड तालुका अध्यक्ष शेख एजाज, मा. शिवाजी भोसकर यांनी केले आहे. ही बैठकीचे आयोजन वार रविवार दिनांक ६-७-२०२५ वेळ १ वाजता बीड जिल्हा » पान २ वर

## गेवराई तालुका अध्यक्षपदी महेश बेदरे यांची फेरनिवड

### स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये तरुणांना संधी देणार : महेश बेदरे

गेवराई । किसान न्युज

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने मागील काही दिवसांमध्ये काँग्रेसच्या संघटनात्मक कार्यकारणी



बदलामध्ये राज्यभरामध्ये निवड प्रक्रिया पार पडल्या त्यामध्ये नव्याने नुकतेच झालेले प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी राज्यभरातील जिल्हाध्यक्ष व तालुकाध्यक्षांच्या निवडी प्रत्यक्ष मुलाखती घेऊन केल्या आहेत बीड जिल्हा काँग्रेसच्या वतीने सर्व उत्सुक तालुकाध्यक्षांच्या नुकत्याच प्रदेश अध्यक्ष सपकाळ यांनी घेतल्या बीड जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांच्या मुलाखती घेऊन नव्याने निवडी केल्या यामध्ये काँग्रेसच्या खासदार रजनीताई पाटील, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री अशोकराव पाटील यांच्या आदेशाने जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे » पान २ वर

### गेवराई शहरात एकही कोंडवाडा नसल्याने जनावरे मोकाट

## न.प.च्या हलगर्जीपणा व अकार्यक्षमतेचा प्रभाव, कोंडवाड्याअभावी जनावरे रस्त्यावर

गेवराई । किसान न्युज



गेवराई शहरात वाढत असलेल्या वाहतूकीच्या समस्येवर वाहतूक विभाग एक ना एक नवनवीन उपक्रम राबवून आटोक्यात आणण्याचे प्रयत्न करीत असतानाच शहरात मोकाट जनावरांमुळे वाहतुकीची समस्या वाढतच चालली आहे. मात्र गेवराई नगर परिषदेकडे या मोकाट जनावरांना बंदीस्त करून ठेवण्यासाठी एकही कोंडवाडा नसल्याने जनावरे शहरात मोकाट फिरत आहेत. जनावरे रस्त्यांवरच ठाण मांडत असल्याने वाहतूकीला त्रास » पान २ वर

### आषाढी एकादशी निमित्त बीड जिल्ह्यात

## खाटीक समाजाचा मांस विक्री बंदचा निर्णय : कुरैशी

बीड । किसान न्युज



आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त बीड जिल्ह्यातील खाटीक समाजाने सर्व मांस विक्रीची दुकाने बंद ठेवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र राज्य खाटीक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष तसेच एकता युवा मंचचे संस्थापक अध्यक्ष जावेद कुरैशी यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, हा निर्णय समाजाच्या धार्मिक आणि सांस्कृतिक मूल्यांप्रती आदर व्यक्त करण्यासाठी घेण्यात आला आहे. आषाढी एकादशी हा महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाचा अत्यंत महत्त्वाचा सण आहे. या दिवशी लाखो भाविक पंढरपूरच्या विठ्ठल-रखुमाई दर्शनासाठी एकत्र येतात. या पवित्र दिवशी खाटीक समाजाने मांस विक्री बंद ठेवून धार्मिक सौहार्द आणि सामाजिक एकतेचा संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे. जावेद भैय्या कुरैशी यांनी सांगितले की, आम्ही सर्व धर्मांचा आदर करतो आणि आषाढी » पान २ वर

स्थानिक सोने चांदीचे भाव..

पंकज ज्वेलर्स

पिंगळे गल्ली, कारंजा रोड, बीड

✆ 9850643058

सोने २४ कॅरेट 97,300

२२ कॅरेट 95,000

चांदी प्रतिकिलो 105,000